# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २५/०३/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या देशी दारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दि. २५/०३/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोलीस स्टेशन काटोल परीसरात प्रोव्हिशन रेड करीता फिरत असता, मुखबिरद्वारे माहीती मिळाली की, भिमराव सावरकर नावाना इसम हा त्याचे राहते घरी संगमा नगर येथे देशी दारूची विक्री करीत आहे. यावरून स्टाफने संगमा नगर येथे भिमराव आवरकर याचे घरी रेड केली असता त्याची घराची दारूबाबत झडती घेतली असता, घराचे अंगणामध्ये वॉल कंपाउंडला लागून कागदी खाकी १२ खोके ज्यावर देशी दारू विदर्भ लिकर कॉर्पोरेशन असे लिहीले असलेले मिळून आले. सदर इसमाला दारू बाळगणेबाबत परवाना विचारला असता त्याने नसल्याचे सांगीतले. सदर खोक्याची पाहणी केली असता, प्रत्येकी खोक्या मध्ये ४८ देशी दारू मंत्री नं. १ डिलक्सच्या सिलबंद निपा व एका कापडी थैली मध्ये देशी दारू संत्री नं. १ डिलक्सच्या १० सिलबंद निपा अशा एकूण ५८६ देशी दारू संत्री नं. १ डिलक्सच्या सिलबंद निपा प्रत्येकी किंमती ७० प्रमाणे ४१०२०/— रूपयाचा माल मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला. आरोपी भिमराव सुर्यभानजी सावरकर, वय ६६ वर्ष, रा. संगमा नगर काटोल याचे विरूद्ध पोस्टे काटोल येथे कलम ६५ (ई) म.दा.का. प्रमाण गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब, नागपूर ग्रा. श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार निशांत मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक कृष्णकांत गोगले, पोहवा कैलास उईके, पोना भूषण मदनकर, पोशि गौरव बखाल, मपोहवा सुनिता साठवने, चालक सफौ. बावने, पोना रंजित रोकडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर